**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Chhatrapati Sambhajinagar**
**431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A+' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation : (0240) 2403118/2403119/2403115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**छत्रपती संभाजीनगर**
**४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे "अ+" दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :: शैक्षणिक विभाग ::

# परिपत्रक

**संदर्भ :-** सह आयुक्त (सा.प्र.) तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ निवडणूक, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा. क्र. २०२६/सा.प्र./प.म.स.नि./ कावि-२४६, दि. १८/१०/२०२६.

या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक बीआयई/२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/नि-१ दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२६ अन्वये औरंगाबाद विभाग, पुणे विभाग व नागपूर विभाग या पदवीधर तसेच अमरावती विद्यापीठ विभाग व पुणे विभाग या शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर केलेला आहे. सदर निवडणूकीचे मतदान दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ०८:०० ते सायंकाळी ०४:०० पर्यंत होणार आहे.

तद्अनुषंगाने, मतदार असलेल्या पदवीधर / शिक्षक मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५B नुसार दि. २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी विशेष नैमित्तिक रजा जाहीर करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. :- शैक्षा/संलग्न/२०२६-२७/ 5836 )(
दिनांक :- २२/१०/२०२६ )(
)(
)(

**उपकुलसचिव**
(शैक्षणिक विभाग)

***********

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक क्रमांक :- आस्था / आरओ / ३३ / २०२६

संदर्भः- सह आयुक्त (सा.प्र.) तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, ०५-औरंगाबाद विभाग पदवीधन मतदार संघ निवडणूक, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा. क्र. २०२६/सा.प्र./प.म.स.नि./ कावि-२४६, दि. १८/१०/२०२६.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक बीआयई/२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/नि-१ दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२६ अन्वये औरंगाबाद विभाग, पुणे विभाग व नागपूर विभाग या पदवीधर तसेच अमरावती विभाग व पुणे विभाग या शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर केलेला आहे. सदर निवडणुकीचे मतदान दिनांक २३ ऑक्टोबर, २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ०८:०० ते सायंकाळी ०४:०० पर्यंत होणार आहे.

तद्अनुषंगाने, मतदार असलेल्या पदवीधर / शिक्षक मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५B नुसार दि. २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी विशेष नैमित्तिक रजा जाहीर करण्यात आली आहे.

सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

विद्यापीठ परिसर, )(
छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४ )(
संदर्भ क्र. :- आस्था/आर.ओ./३३/२०२६ )(
दिनांक :- १९ ऑक्टोबर, २०२६ )(

कुलसचिव

***********

**या परिपत्रकाची प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव;**

०१) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख,
०२) संचालक, उपपरिसर, धाराशिव
०३) संचालक, युनिक
०४) जनसंपर्क अधिकारी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

P-

महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर
(सामान्य प्रशासन शाखा-निवडणूक)

दुरध्वनी क्र -.0240-2339811 पत्ता- दिल्ली गेट जवळ, छत्रपती संभाजीनगर 431001 Email-dcg.aurangabad@gmail.com

**निवडणूक प्राधान्य**

जा.क्र. २०२६/सा.प्र./प.म.स.नि./कावि-२४६ दिनांक:-१८/१०/२०२६.

प्रति,

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी,
५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी छत्रपती संभाजीनगर / जालना / परभणी / हिंगोली / नांदेड / लातूर / बीड / धाराशिव (उस्मानाबाद).

विषय :- ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ मध्ये मतदानाचा हक्क बजावण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्याबाबत.

संदर्भः- १) मा. भारत निवडणूक आयोगाची प्रेस नोट क्र. ECI/PN/११८/२०२६, दि.२२.०९.२०२६.
२) मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र बीआयई /२०२६/प्र.क्र.१५७/२६/३३/नि-१, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२६.
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक-१५८ व दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२६.

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ साठी मतदान दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ (शुक्रवार) रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत होणार आहे.

सदर निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील कलम १३५B नुसार भरपगारी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २३.०६.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदवीधर निवडणुकीमध्ये मतदार असलेल्या व्यक्तींना विशेष नैमित्तिक रजा जाहीर केलेली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तथापि, सदर विशेष नैमित्तिक रजा खाजगी आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या मतदारांना लागू होत नाही. त्यामुळे खाजगी आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतदानाच्या दिवशी किमान ४ तासांची विशेष सवलत देण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधित खाजगी आस्थापनांना सूचना देण्यात याव्यात. या कार्यालयाकडून यापूर्वीच विभागातील संबंधित जिल्ह्यांना याबाबत पत्राद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर बाब पुन्हा निदर्शनास आणून देऊन २ तास ऐवजी ४ तासांची विशेष सवलत देण्या बाबत अवगत केले आहे. तसेच याबाबतची व्यापक प्रसिद्धी जिल्हास्तरावर करण्यात यावी.

तरी, आपल्या जिल्ह्यातील सर्व संबंधित खाजगी आस्थापना, उद्योग, संस्था व कार्यालयांना वरीलप्रमाणे सूचना देऊन मतदारांना मतदानासाठी आवश्यक वेळ उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच स्थानिक वृत्त पत्राद्वारे ,दूरदर्शन व आकाशवाणी इ. प्रसारमाध्यमाद्वारे व्यापक प्रसिद्धी दयावी , ही विनंती.

Digitally signed by
Manjusha Ramchandra Miskar
Date: 18-10-2026 15:42:05

(मंजुषा मिसकर)
सह आयुक्त (सा. प्र.) तथा
सहायक निवडणूक निर्णय अधिकारी
05-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघ निवडणूक

प्रतिलिपी :- १ . उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी ,महाराष्ट्र राज्य यांना माहिती स्तव सादर.

. उप जिल्हा निवडणूक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर / जालना / परभणी / हिंगोली / नांदेड / लातूर / बीड / धाराशिव (उस्मानाबाद) यांना आवश्यक कार्यवाही व व्यापक प्रसिद्धीसाठी.